**फौ.कि.अ.क्र. ५/२०२२**
सारिका व इतर वि. आनंदा व इतर
**नि.क्र.३२ लगत**

**जाबदारतर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर जबाबः–**

**नाव :– आनंदा नाना खरात.**

१८. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

**(एस.ए.विराणी)**

दि. ०८.०४.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

**उलटतपास अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१९. अर्जदार माझ्या पत्नी आणि मुलगी आहेत. माझे ग्रॅज्युएशन पर्यंतचे शिक्षण २००५ साली झाले. अर्जदाराशी माझे लग्न दि. २७.११.२०११ रोजी झालेले आहे. लग्नाच्या एक दीड वर्षापूर्वीपासून मुंबईला नोकरीला लागलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मुलगी बघायला गेलो असताना मला ४०,०००/- रुपये पगार आहे आणि मी लग्नानंतर पत्नीला मुंबईला घेऊन जाणार असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे लग्न अर्जदाराच्या मामाच्या दारात आमच्या गावी झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या वेळी अर्जदाराच्या घरच्यांनी मला दिवाण, गादी, शोकेस कपाट, स्वयंपाकाचा गॅस, शेगडी, सोफासेट, कुलर, ड्रेसिंग टेबल आणि सर्व प्रकारची संसारउपयोगी भांडी कुंडी दिल्या होत्या. साक्षीदार म्हणतो, फक्त भांडीकुंडी दिले होते. हे मला माहित नाही की, सदरच्या सर्व वस्तू अर्जदाराच्या आईवडीलांनी कर्ज काढून दिले होते.

२०. लग्नानंतर मी अर्जदारासोबत ६ महिने गावीच राहिलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर फक्त एक महिना गावी राहिलो व नंतर मुंबईला निघून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, अज्रदार मला मुंबईला घेऊन जाण्यासाठी विचारणा करत असल्यामुळे चिडून जाऊन मी तिला मारहाण करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी मुंबईला असताना अर्जदार माझ्या आईवडीलांसोबत गावी राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे भाऊ, त्याची पत्नी आणि आईवडील असे एकत्र कुटुंबात अर्जदार राहत होती.

हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडे दोन गायी होत्या ज्यांचे सर्व करुन अर्जदार आईवडीलांना शेतात जात होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर फक्त एक दोन महिनेच व्यवस्थीत नांदवलो. साक्षीदार म्हणतो, कायमची नांदवलो. हे म्हणणे खरे नाही की, मुंबईहून परत आल्यानंतर आईवडील अर्जदार घरातील कामे करत नाही अशी तक्रार केल्यावर अर्जदार हिला मी मारहाण करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, २०१९ मध्ये नोटीस पाठवेपर्यंत मी मुंबईत कुठे राहतो, काय राहतो याची माहिती अर्जदाराला दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वडीलांना नोटीस पाठवल्यानंतर माझ्या वडीलांना माझा मुंबईचा पत्ता अर्जदार हिला दिला होता.

२१. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर ४ वर्षाने अर्जदार हिला दिवस गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे लग्नाच्या २–३ वर्षानंतर अर्जदार हिला तू वाजुंटी आहेस आम्हांला मूलबाळ देत नाही, म्हणून मला सोडचिठ्ठी दे असे म्हणून तिचा मानसिक व शारिरीक छळ केला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यासोबत नांदत असताना ती गरोदर राहिली आणि दि. १९.०८.२०१६ ला ती तिच्या माहेरी बाळंतपण झाली. हे म्हणणे खरे नाही की, मुलगी झाली म्हणून मी अर्जदार व मुलीला पाहायला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, तीन महिन्यानंतर माझे वडील अर्जदाराला घेऊन तिच्या घरी परत नेले. हे म्हणणे खरे नाही की, बाळंतपणात अर्जदाराला काय त्रास झाले, किती खर्च आला याबाबत मी चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे नांदत असताना अर्जदार ही दुस–यांदा गरोदर राहिली. हे म्हणणे खरे नाही की, पहिली मुलगी सव्वा वर्षाची असताना देखील अर्जदाराला दुस–यांदा बाळंतपणासाठी माहेरी पाठवत असताना तिच्यासोबत मुलीला पाठवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारच्या माहेरच्या लोकांशी मी तिला फोनवर बोलू देत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६.११.२०१७ ला अर्जदार दुस–यांदा बाळंतीण झाली. हे म्हणणे खरे आहे की, दुसरीदेखील मला मुलगीच झाली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही पाच महिने अर्जदार व दुस–या मुलीला पाहायला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, पाच महिन्यानंतर अर्जदार हिला सासरी पुन्हा नांदायला घेऊन आलो. हे म्हणणे खरे नाही की, दुसरी देखील मुलगी झाली म्हणून आम्ही सर्व जाबदार अर्जदार हिला अधिकच त्रास देऊ लागलो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार आजारी असताना देखील तिचा उपचार करत नव्हतो आणि शेतात कामाला जायला लागू नये म्हणून तू सोंग करतीस असा आरोप तिच्यावर लावत. हे म्हणणे खरे नाही की, २०१९ मध्ये अर्जदार हिला माहेरी जायचे असताना तिला जाऊ दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नंतर माझ्या वडीलांनी सांगितल्यामुळे अर्जदार तिच्या माहेरी दिवाळीसाठी गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मोठी मुलगी अर्जदार सोबत पाठवली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दिवाळीनंतर अर्जदार हिने वारंवार आम्हांला फोन केला परंतु आमच्यापैकी कुणीच तिला परत आणायला गेले नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर २०20 च्या दरम्यान आम्ही अर्जदार

हिच्याकडे सोडचिठ्ठी मागायला तिच्या माहेरी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर दि. २९.११.२०२१ ला अर्जदाराने आम्हांला वकिलांमार्फत नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या नोटीसाला खोटया मजकूराची उत्तरे दिली. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माहेरी राहत असताना तिची दैनंदिन खर्चाची सोय मी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पती आणि वडील म्हणून मी अर्जदारांकडे असलेली माझी कोणतीही जबाबदारी पार पाडली नाही.

२३.     हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही कोर्टात मुलीला आणल्यानंतर मी प्रथमतः तिला पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्न ठरले त्यावेळी मला ४०,०००/– रुपये पगार होता आणि आता वाढलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला मागणी करत असल्याप्रमाणे पोटगी देण्याची माझी आर्थिक ऐपत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी गावी शेती आहे. साक्षीदार म्हणतो, फक्त अर्धा एकर शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला मुली होत होत्या म्हणून मला तिला नांदवायची नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार हिला मारहाण करत असल्यामुळे ती नांदायला घाबरते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार मागणी करत असलेल्या सर्व गोष्टी मी देण्यास सक्षम आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात आणि मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात माझ्या आर्थिक परिस्थितीबाबत केलेला मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही माझ्याकडे नांदायला यावी मी यासाठी सातारा जिल्ह्यात अर्ज केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.                समक्ष

Sd/–

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– ०८.०४.२०२५          न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.